| MHAU110005562026 | किरकोळ फौजदारी अर्ज नं.६२/२०२६ मधील नि.८ खालील अंतिम आदेश (कडुबा ताठे वि. सरकार.) |
|---|---|

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे आहे की, त्यांनी ऑनलाईन फसवणुकीतील गोठवलेली रक्कम परत मिळण्याकरीता सदरचा अर्ज सादर केला आहे. सदर प्रकरणाचा तपास चालु असतांना प्रकरणात अर्जदाराची रक्कमेत वाढ झाली असल्याचे पोलीसांच्या म्हणणे आले आहे. त्यामुळे मुळ अर्जात विषय परिच्छेद, परिच्छेद क्र.५, ६ व विनंती परिच्छेद ब मधील गोठवलेली रक्कम २,१५,०१०.४९/– रुपये असा उल्लेख केला आहे, परंतु गोठवलेली रक्कम २,२८,०९०.५/– आहे. त्यामुळे रक्कम २,१५,०१०.४९/– ऐवजी रक्कम २,२८,०९०.५/– अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी आपले लेखी म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, अर्जदाराने केलेला दुरुस्तीचा अर्ज हा मुळ अर्जाच्या विसंगत आहे. अर्जदाराचा मुळ अर्जात दुरुस्ती करण्याचा परवानगीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. अर्जदार यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागत असलेली दुरुस्ती मंजूर होवून मिळण्यास अर्जदार पात्र आहे काय ? | होय |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येत |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. |

## कारणमिमांसा

५. अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञांचा व सरकारी वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्र.१ व २ करीता –

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज गोठवलेले पैसे मिळण्याकरीता दाखल केला आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली दुरूस्ती ही विषय परिच्छेद, परिच्छेद क्र.५, ६ व विनंती परिच्छेद ब मध्ये आलेली रक्कम २,१५,०१०.४९/– ऐवजी रक्कम २,२८,०९०.५/– असा उल्लेख करण्याकरीता मागितली आहे. सदरची दुरुस्ती सामाविष्ट केल्याने निश्चीतपणे अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होणारा नाही. त्यामुळे कोणाचेही काहीही नुकसान होत नाही. अर्जदार मागत असलेली दुरुस्ती योग्य असुन ती मंजूर करण्या योग्य आहे. म्हणुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार ने प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.06.18 16:35:49 +0530

**दिनांक:- १८.०६.२०२६**

**( चंद्रकांत रा. पाटील )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**न्यायालय क्र. २ फुलंब्री.**